प्रथम मान्यता

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ काविअ/ /2019
पुणे 1 दिनांक :- 7/1/2019

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
**सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसा संचलित आर.एम.डी सिंहगड स्प्रिगडेल स्कूल,वारजे-111/1,मुंबई पुणे बॅंगलोर हायवे जवळ,जि.पुणे**

**विषय:-** सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाब

**संदर्भ** 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013
2.शासन निर्णय जा.क्र.678/प्राशि-3 , दि.18.8.2009
3.मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे जा.क्र.शिउस/प्राथ-2/काविअ/मान्यता दि.19.4.2010

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर विद्यमान प्राथमिक शाळेस प्राथ ते उच्चप्राथमिक इ. १ ली ते इ.७ वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नोव व पुंर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| 1 | **सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसा. सिंहगड रोड,पुणे-51 संचलित** | **आर.एम.डी सिंहगड स्प्रिगडेल स्कूल,वारजे-111/1,मुंबई पुणे बॅंगलोर हायवे जवळ,जि.पुणे** | इंग्रजी | कायम विना अनुदानित तत्वावर | प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ.१ली ते इ.७ वी | 2017-18 |

**अटी व शर्ती**

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
3.या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
4.संदर्भ क्रमांक 02 अन्वयेसन 2017-18 मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6 शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
7. शासन निर्णय जा.क्र.678/प्राशि-3 , दि.18.8.2009 तील अटी शर्तीतील मुददा क्र.2 चे कायम पूर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
8. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

11 APR 2010

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,पुणे.

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,

विषय : सन २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत.(माध्यम - इंग्रजी) . . .

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक नप्राश १००८/ प्र.क्र.६७८/ प्राशि-३, दिनाक १८ ऑगष्ट २००९

२. आपले पत्र क्र.जि.प./शिक्षण/प्राथ/खाप्राशा/४९/२०१० दिनांक २२/३/२०१०

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून २००९ पासून इ. १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर खाजगी प्राथमिक शाळेस **कायम विनाअनुदान तत्वावर** भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १ | सिंहगड टेक्निकल एज्यूकेशन सोसायटी, वडगाव (बु) पुणे | पवन गांधी सिंहगड स्प्रिगं डेल प्राथ.स्कूल,आंबाडवेट, ता.मुळशी,जि.पुणे. | १ ली | इंग्रजी | जून २००९ पासून |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादींमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

Pawan Gandhi Sinhgad Spring Dale School
Ambadvet (Pirangut...)

कायम विना अनुदानं तत्वावर ( इंग्रजीमाध्यम )

पुणे जिल्हा परीषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./२/ ९९
/खा.प्रा.शा./ [illegible] / दि. १/१०/० १४/०४/२०११

प्रति,

मुख्याध्यापक./मुख्याध्यापिका,

पवनगांधी सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल, आंबडवेट ता. मुळशी (पिरंगुट)

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम /नादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-व्ही.एल.एस.-२००२/ (१०००/०२) प्रा.शि.-३ दिनांक १४ जाने.२००३.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नादा./ नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम/ नादा तुकडया / वर्ग जून २०१० पासून सन २०१० - २०११ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ नादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पवनगांधी सिंहगड स्प्रिंग डेल स्कूल आंबडवेट ता. मुळशी (पिरंगुट) | इंग्रजी | २ री ते ७ वी | नैसर्गिक | मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या आधीन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

Pawan Gandhi Sinhgad Spring Dale School
Ambadvet, (Pirangut), Pune - 412 208.
Inward No. 8
Date 06/04/11 Sign.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परीषद,पुणे

प्रत :माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना.

परवानगी वर्ष :- २००९-१०

यांचे कार्यालय
दिनांक :

प्रति

सचिव,
सिंहगड टेक्नीकल एज्यु. सोसा. ४४/१ वडगांव
बु. सिंहगड रोड, पुणे

2009

**विषय** :- सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत. . .

**संदर्भ** :- शासन निर्णय क्रमांक-नमाशा/२००९/(७१७/२००९)/माशि-१, दिनांक २४ ऑगस्ट, २००९

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड टेक्नीकल एज्यु. सोसा. ४४/१ वडगांव बु. सिंहगड रोड, पुणे | पवनगांधी सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल, अंबाडवेट, ता. मुळशी, जि. पुणे | आठवी | इंग्रजी |

**कायम विना अनुदान**

आपल्या शाळेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या शर्तीवरच नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

१) आपल्या संस्थेस वर नमूद केलेल्या ठिकाणी नविन माध्यमिक शाळेस इंग्रजी माध्यमासाठी कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३) शासनाच्या पूर्व परवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४) आपण आपल्या संस्थेच्या अध्यक्षांचे सदरची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र (रु. १००/- च्या स्टॅंप पेपरवरील) आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे सादर करावे.

५) आपल्या संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकरक असणे आवश्यक आहे.

६) "कायम विनाअनुदान तत्वावर मिळालेली शाळा" असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे.

७) सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने / शाळेने संबंधित अधिकाऱ्यांशी / शासनाशी पत्रव्यवहार करतांना "कायम विनाअनुदानित शाळा" अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

८) आपली संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १९६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

९) संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

१०) सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

११) सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी नाहीत तसेच सदर संस्थेची एखादी शाळा शासनाने ताब्यात घेण्याचे प्रकरण प्रलंबीत नाही.

१२) सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही. सवरचे पत्रे प्राप्त होताच वरील १ ते १२ विहित बाबींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसांचे आत आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या कागदपत्रासह / प्रमाणपत्रासह कळवावे.

१३). शासन निर्णय, दि. १९ ऑक्टोबर, २००७ मधील तरतूदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्यांच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील, अन्यथा या शाळेचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत असे गृहित धरले जाईल.

१४) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र.-एसएसएन २१०३/(५०/०३)/माशि-२, दि. २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.

स्थळ प्रतीवर मा. शि.उ. सं. यांची सही असे.

(बी. एम. ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी

१) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, पुणे
आपण संबंधित संस्थेची अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची / प्रमाणपत्रांची तसेच किती वर्ग सुरु आहेत याची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

२) मा. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर.

३) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना सविनय सादर

४) निवड नस्ती



Pawan Gandhi Sinhgad Spring Dale School
Ambadvet. (Pirangut). Pune - 412 208.

कायम विनाअनुदान

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.जिप/शिक्षण/माध्य/९८२६/११
पुणे दिनांक ८/६/२०११

प्रति,

सचिव / अध्यक्ष
सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी
वडगावं बु ाा पुणे-४१

**विषय** - **नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत**
इ.९ वी (जून २०१० पासुन)

**संदर्भ** - १) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.माध्य-३/१२/नमाशा/प्र.मा/पुवि/२०११/१०७७३/७६दि.३०/५/२०११

२) मुख्याध्यापक पवनगांधी सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल, अबाड्वेट ता.मुळशी जि.पुणे यांचा दि.२/६/२०११ चा प्रस्ताव.

आपल्या शैक्षणीक संस्थेव्दारा संचलीत पवनगांधी सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल, अंबाडवेट ता.मुळशी जि. पुणे या माध्यमिक शाळेस जुन २००९ पासुन कायम विना अनुदान तत्वावर इ.८ वीचा वर्ग सुरु करणेस संदर्भ क्र.१ अन्वये मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांनी परवानगी तसेच प्रथम मान्यता दिलेली आहे.

सदर विदयालयात जुन २०१० पासुन इ.९ वीचा वर्ग सुरु होत असुन सदरच्या वर्गास जुन २०१० पासुन नैसर्गिक वाढीने कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
शिक्षणाधिकारी (माध्य.)
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

प्रत - १) मुख्याध्यापक,
पवनगांधी सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल, अंबाडवेट ता.मुळशी जि. पुणे

२) मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सादर.-

**कायम विनाअनुदान**

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.जिप/शिक्षण/माध्य/ १८०६ /११
पुणे दिनांक २९ /६/२०११

प्रति,

सचिव / अध्यक्ष
सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी
वडगावं बु ।। पुणं-४१

**विषय** - **नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत**
इ.१० वी (जून २०११ पासुन)

**संदर्भ** - १) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.माध्य-३/१२/ नमाशा/प्र.मा/पुवि/२०११/१०७७३/७६दि.३०/५/२०११
२) या कार्यालयाकडील दि.६/६/२०११ चे पत्र.
२) मुख्याध्यापक पवनगांधी सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल, अबाडवेट ता.मुळशी जि.पुणे यांचा दि.१६/६/२०११ चा प्रस्ताव.

आपल्या शैक्षणीक संस्थेव्दारा संचलीत **पवनगांधी सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल, अंबाडवेट ता.मुळशी जि. पुणे** या माध्यमिक शाळेस जुन २००९ पासुन **कायम विना अनुदान** तत्वावर इ.८ वीचा वर्ग सुरु करणेस संदर्भ क्र.१ अन्वये मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांनी परवानगी तसेच प्रथम मान्यता दिलेली आहे. तसेच संदर्भ क्र.२ अन्वये इ.९ वीच्या वर्गास जून २०१० पासून नैसर्गीक वाढीने कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे.

सदर विदयालयात जून २०११ पासुन इ.१० वीचा वर्ग सुरु होत असुन सदरच्या वर्गास जून २०१ पासुन नैसर्गिक वाढीने **कायम विनाअनुदान** तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
पुणे जिल्हा परीषद, पुणे.

प्रत - १) मुख्याध्यापक,
पवनगांधी सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल, अंबाडवेट ता.मुळशी जि. पुणे

२) मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सादर.-